# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 20/04/2021 (मंगळवार)

(सकाळ)

---

### विनयभंग

पो.स्टे. मौदा :– दि. 17/04/2019 चे 12.55 वा. ते 19.25 वा. सुमारास 21 वर्षीय फिर्यादी/पीडीता व फिर्यादीच्या काकाने फिर्यादीचा मोबाईल दुरुस्ती साठी आरोपी नामे– आशु उर्फ धमेन्द्र कोहले रा. वाघोरी याच्या कडे दिले होते. आरोपीने फेसबुकवरुन फिर्यादीला फ्रेंड रिकवेस्ट पाठवून तिच्या सोबत ओळखी केली व तिला म्हटले की, ''तु माझ्याशी लग्न कर'' फिर्यादीने नकार दिला असता आरोपीने तिला हातबुक्कीने मारहाण केली. दि. 17/04/2021 रोजी दुपारी 12.55 वा. आरोपीने फिर्यादीचे काकाजी च्या व्हॉटस्पअपवर आरोपी व फिर्यादीचे अश्लिल फोटो व चॅटींग पाठवून बदनामी करीत तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354(डी) भादंवि. सहकलम 66(सी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री विजय जाधव हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. मौदा – दिनांक 18/04/2021 चे 12.00 वा. ते 17.00 वा. चे सुमारास पो.स्टे. मौदा हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि मैत्रीणीकडे जात आहे असे सांगुण ती घरून निघुन गेली. अज्ञात आरोपीने तिला फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रविन्द्र बकाल हे 9823168964 हे करीत आहे.

### नैसर्गिक विज पडुन मृत्यू

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 3 कि.मी. अंतरावर तास भिवापुर येथे दिनांक 19/04/2021 चे 02.35 वाजता दरम्यान संदिप शेशराव बारेकर (मृतक)वय 34 वर्ष रा. तास भिवापूर हा त्याच्या अंगणातुन परत घरी जात असतांना त्याच्यावर नैसर्गिक विज पडल्यानंतर तो जखमी झाला व अंगणात पडलेला दिसला. त्याला पुढील उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय भिवापुर येथे नेले असता डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी दिलीप परसराम बारेकर वय 44 वर्षे रा. तास भिवापूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ डहाके 9823517412 हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 15 किमी. अंतरावर मौजा थडीपवनी येथे दिनांक 19/04/2021 चे 18.00 वा. दरम्यान मृतक नामे– नानुबाई रामकृष्ण ठाकरे वय 65 वर्ष रा वंडली वघाळ त. वरूड जि. अमरावती ही मतीमंद असून ती 2 ते 3 दिवसापासून घरी हजर नसल्यामुळे तीची मिसिंगबाबत रिपोर्ट बेनोडा पो.स्टे येथे दिली होती. मृतक ही घटणा. ता. वेळी व ठिकाणी थडीपवनी ते खेडी खुर्द पांदन रस्त्यावर पडुन मरण पावलेली दिसली असे फोनद्वारे फिर्यादीला माहिती मिळाल्याने फिर्यादी याने समक्ष घटनास्थळावर जाउन पाहनी केली असता मृतक ही पानी जेवन व उन्हाच्या जास्त तिव्रतेमुळे मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– हर्षवर्धन गंगाधरराव इंगोले वय 35 वर्ष रा. वडाळा ता. वरूड जि. अमरावती यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास नापोशि मोरेश्वर चलपे मो. क्र. 9767581044 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर